केंद्र पुरस्कृत कृषी उन्नती योजनेंतर्गत कृषी यांत्रिकीकरण उप अभियान सन २०१७-१८ मध्ये राज्यात राबविण्यासाठी वित्तीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः कृयांउ-१०१७/ प्र.क्र.६४/१७/१४अे
मादाम कामा मार्ग, हुमात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई- ४०० ०३२
तारीख: ३ मार्च , २०१८

वाचा

१) केंद्र शासनाने उपअभियानासंदर्भात http://farmech.dac.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेल्या मार्गदर्शक सूचना.
२) शासन निर्णय क्रमांकः ०३१७/प्र.क्र.१८/राकृवियो कक्ष, दिनांक १३ एप्रिल, २०१७
३) केंद्र शासनाचे पत्र क्र. ३-१/२०१५ M&T (I&P), दि. १ मे, २०१७
४) शासन निर्णय क्र. कृयांउ-१०१७/ प्र.क्र.६४/१७/४अे, दि.२१ जून, २०१७
५) शासन निर्णय क्र. कृयांउ-१०१७/ प्र.क्र.६४/१७/४अे, दि.३ ऑगस्ट, २०१७
६) केंद्र शासनाचे पत्र क्र.३-१/२०१५/M&T(I &P) दि. १९ फेब्रुवारी, २०१८.

प्रस्तावना

सन २०१५-१६ पासून कृषि यांत्रिकीकरण उप अभियान कृषी उन्नती योजने अंतर्गत राबविण्यात येत आहे. सदर उपअभियानांतर्गत एकूण आठ घटक असून, घटक क्रमांक १ व २ हे नवीन तंत्रज्ञानाने विकसित केलेल्या संयंत्राची प्रात्यक्षिके, प्रशिक्षण व चाचणी बाबत आहेत. सन २०१४-१५ पर्यंत, हे दोन्ही घटक १००% केंद्र पुरस्कृत व उर्वरीत ६ घटकांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या निधीच्या हिश्श्याचे प्रमाण ७५:२५% असे होते. केंद्र शासनाने सन २०१५-१६ पासून घटक क्र. १ व २ यासाठी केंद्र हिश्श्याचे १००% अनुदानाचे प्रमाण कायम ठेवले असून, उर्वरीत ६ घटकांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या निधीच्या हिश्श्याचे प्रमाण ६०:४० असे केले आहे.

केंद्र शासनाने, सदर उपअभियानासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी संदर्भाधीन अ.क्र.३ येथील दि. १ मे, २०१७ च्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्यासाठी ₹ ५६८८.०० लक्ष एवढ्या रकमेच्या कार्यक्रमास मान्यता दिली व केंद्र हिश्श्याचा पहिल्या हप्त्याचा ₹ १७०६.४० लक्ष एवढा निधी वितरीत केला होता. केंद्र शासनाने मंजूर केलेल्या रु.५६८८.०० लक्ष रकमेच्या कार्यक्रमास संदर्भाधीन अनु.क्र.४ येथील दि, २१ जून, २०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता व सर्वसाधारण प्रवर्गासाठीचा केंद्र हिश्श्याचा रु. १२११.५४ लक्ष व त्याप्रमाणात आवश्यक राज्य हिस्सा रु. ८०७.६९ लक्ष अशा एकूण रु. २०१९.२३ लक्ष एवढया रक्कमेच्या कार्यक्रमास वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. अनुसूचित जाती/जमातीचा केंद्र हिश्श्याचा निधी रु.४९४.८६ लक्ष व त्याप्रमाणात आवश्यक राज्य हिस्सा रु. ३२९.९० लक्ष अशा एकूण रु. ८२४.७६ लक्ष एवढा रक्कमेच्या कार्यक्रमास दि.३ ऑगस्ट, २०१७ च्या शासन निर्णयान्वये वित्तीय मान्यता देण्यात आली आहे.

केंद्र शासनाने संदर्भाधीन अनु.क्र.६ येथील दि. १९ फेब्रुवारी, २०१८ च्या पत्रान्वये केंद्र हिश्श्याचा दुसऱ्या हप्त्याचा सर्वसाधारण प्रवर्गासाठी रु. १२११.४० लक्ष, अनुसूचित जाती प्रवर्गासाठी रु. २७३ लक्ष व अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी रु. २२२ लक्ष असा एकूण रु. १७०६.४०लक्ष एवढा निधी वितरीत केला आहे. त्यापैकी सर्वसाधारण प्रवर्गचा केंद्र हिश्श्याचा रु. १२११.४० लक्ष व त्याप्रमाणात आवश्यक राज्य हिस्सा रु.८०७.६० लक्ष असा एकूण रु.२०१९ लक्ष कृषी आयुक्तालयास बीडीएस प्रणालीवर उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. या अनुषंगाने, शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

१) कृषी यांत्रिकीकरण उप अभियान सन २०१७-१८ या वर्षात सर्वसाधारण प्रवर्गासाठी राबविण्यासाठी केंद्र हिश्श्यापोटी ₹ १२११.४० लक्ष (अक्षरी रूपये बारा कोटी अकरा लक्ष चाळीस हजार फक्त) व त्याप्रमाणात आवश्यक राज्य हिस्सा ₹ ८०७.६० लक्ष (अक्षरी रूपये आठ कोटी सात लक्ष साठ हजार फक्त), अशा एकूण ₹ २०१९.०० लक्ष (अक्षरी रूपये वीस कोटी एकोणीस लक्ष फक्त) एवढा निधी बीडीएस प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२) सदर खर्च खालील लेखाशीर्षाखालील सन २०१७-१८ च्या मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

मागणी क्रमांक-डी-३
२४०१-पीक संवर्धन,
(००) ११३-कृषी अभियांत्रिकी
(००)(०८) कृषी उन्नती योजना कृषी अभियांत्रिकीकरण उप अभियान (कें.पु.यो.)
(केंद्र हिस्सा ६०%) , (२४०१ २५१३), ३३ अर्थसहाय्य

मागणी क्रमांक-डी-३
२४०१-पीक संवर्धन,
(००) ११३-कृषी अभियांत्रिकी
(००)(१६) कृषी उन्नती योजना कृषी अभियांत्रिकीकरण उप अभियान
(राज्य हिस्सा ४०%) ,(२४०१ ८७३६)- ३३ अर्थसहाय्य

३) सदर निधी हा पात्र लाभार्थ्यांना जिल्हास्तरावर PFMS द्वारे वितरीत करण्यात यावा व याची खातरजमा आयुक्त, कृषी यांनी करावी.

४) सदर कार्यक्रम राबविताना संदर्भाधीन अ.क्र. १ येथील, केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या कृषी यांत्रिकीकरण उप अभियानाच्या मार्गदर्शक सूचना व संदर्भाधीन अनु.क्र.२ येथील दि.१३ एप्रिल, २०१७ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित केलेलया उन्नत शेती समृद्ध शेतकरी अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांचे व संदर्भाधीन अनु.क्र.४ येथील शासन निर्णयातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

५) सदर निधी खर्च करताना तो विहित कार्यपध्दती अनुसरून सर्व वित्तीय कायदे/टेंडर नियमावली व नियमांचे/पक्रियेचे /वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत/P.W.D. मॅन्युअलचे अधिन राहून/C.V.C. तत्वानुसार/CAG च्या निदेंशानुसार/प्रचलित शासन निर्णय/नियम /परिपत्रक/तरतुदीनुसार, बजेट

व कोषागार नियमावलीनुसार खर्च करण्याची कार्यवाही अमंलबजावणी यंत्रणानी करावी. कोणत्याही परिस्थितीत कुठलाही शासन नियम/अधिकाराचा भंग होणार नाही, याबाबत दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित क्षेत्रिय कार्यालयाची राहील.

६) सन २०१६-१७ मध्ये राज्यात सदर अभियानाची अमंलबजावणी व सनियंत्रण करण्याच्या दृष्टिने निधी आहरण व वितरण करणेसाठी विविध स्तरावरील अधिकाऱ्यांना पुढीलप्रमाणे नियंत्रण तसेच आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे:-

अ.क्र.	स्तर	नियंत्रण अधिकारी	आहरण व संवितरण अधिकारी
१	आयुक्तालय स्तर	संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण), कृषि आयुक्तालय, पुणे	सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२	विभाग स्तर	संबंधित विभागीय कृषी सह संचालक	संबंधित विभागीय कृषी सह संचालक कार्यालयातील लेखाधिकारी
३	जिल्हा स्तर	संबंधित जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी	संबंधित जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालयातील लेखाधिकारी
४	उप विभागीय स्तर	संबंधित उप विभागीय कृषि अधिकारी	संबंधित उप विभागीय कृषि अधिकारी
५	तालुका स्तर	संबंधित तालुका कृषी अधिकारी	संबंधित तालुका कृषी अधिकारी

९. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८ एप्रिल, २०१७ मधील अटींची पुर्तता करून सदर परिपत्रकान्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन व प्रधान सचिव (कृषी) यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०३१५३४१८८००१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c, serialNumber=d8d9626c9e038380cd235c048f20d7ce74cffd3a95f2ac3c192e9c991f358271, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2018.03.03 15:13:27 +05'30'

(श्रीकांत आंडगे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. संचालक (निविष्ठा व गुण नियंत्रण), कृषि आयुक्तालय,पुणे

३. कुलगुरू, कृषी विद्यापीठे (सर्व)

४. सर्व सन्माननीय विधीमंडळ सदस्य द्वारा विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५. सर्व संचालक / सहसंचालक, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
६. व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ दिनकरराव देसाई मार्ग, गोरेगाव (पूर्व) मुंबई- ६५
७. विभागीय कृषि सहसंचालक (सर्व)
८. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)
९. सर्व कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद
१०.महालेखापाल, महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर (लेखा परिक्षा) /(लेखा व अनुज्ञेयता)
११.महालेखाकार (स्थानिय) निकाय लेखापरिक्षा व लेखा प्रतिष्ठा भवन,१०१ महर्षी कर्वे मार्ग, मुंबई-४०००२०
१२.माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२.
१३.नियोजन विभाग (का-१४३१) /मंत्रालय, मुंबई-३२
१४.वित्त विभाग (व्यय-१ व अर्थसंकल्प - १३) / मंत्रालय, मुंबई-३२
१५.मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
१६.मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
१७.निवड नस्ती (कार्यासन -४अे)